रयत शिक्षण संस्थेचे

# चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी

## राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार वशबीर - २०२१-२२




10 डिसेंबर 2019 - राष्ट्रीय सेवा योजना आणि मानवी हक्क विभागाच्यावतीने "1 डिसेंबर मानवी हक्क दिन आणि 10डिसेंबर एड्स दिनानिमित्त" डॉ.अमरसिंह राजपूत (पट्टणकोडोली) यांचे व्याख्यान.




30/12/2019- अग्रणी महाविद्यालय योजना शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्यावतीने "राष्ट्रीय सेवा योजना- एक राष्ट्रीय चळवळ" या विषयावर आयोजित कार्यशाळेत बोलताना बीजभाषण व उद्घाटक मा. प्रा डी. जे. चिघळीकर (राष्ट्रीय सेवा योजना, जिल्हा समन्वयक, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर)



30/12/2019 - अग्रणी महाविद्यालय योजना,शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्यावतीने "राष्ट्रीय सेवा योजना -एक राष्ट्रीय चळवळ"या विषयावर मार्गदर्शन करताना मा. प्रा. एम. एम. कांबळे (इचलकरंजी)


जनमत सर्वसामान्यांचे

दैनिक सोलापूर e-mail - dainikjanmat@gmail.com


## राष्ट्रीय सेवा योजना ही महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची - प्रा. डी.जी. चिगळीकर



हुपरी, दि. ३१ (प्रतिनिधी) - राष्ट्रीय सेवा योजना ही महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी महत्वाची चळवळ आहे. या चळवळी मधूनच उद्याच्या भारताचा भावी जबाबदार नागरिक तयार होणार आहे असे प्रतिपादन राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक प्रा. डी.जी.चिगळीकर यांनी व्यक्त केले.

रयत शिक्षण संस्थेच्या चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे महाविद्यालयामध्ये अग्रणी महाविद्यालय , शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना एक राष्ट्रीय चळवळ या कार्यशाळेचे उद्घाटन व बीजभाषण प्रसंगी बोलत होते .यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या सौ. पी.बी.पाटील ह्या होत्या.

राष्ट्रीय सेवा योजना ही भारतातील महाविद्यालयामध्ये एक युवा चळवळ म्हणून राबवले जाते .राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये विद्यार्थ्यांवर बुद्धीचे तसेच श्रमाचे संस्कार घडवले जातात. सामाजिक बांधिलकी व राष्ट्रीय एकात्मता जोपासण्याचे महत्त्वपूर्ण कार्य राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांकडून केले जाते.असे मत प्रा.डी.जी.चिगळीकर यांनी व्यक्त केले. सदर कार्यशाळा तीन सत्रात पार पडली द्वितीय सत्रात प्रा. एम. एम.कांबळे यांनी राष्ट्रीय सेवा योजना आणि पर्यावरण पूरक युवक या विषयावर मार्गदर्शन केले. तृतीय सत्रात सौ. कल्पना रायजाधव यांनी राष्ट्रीय सेवा योजना आणि महिला सबलीकरण या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचे संयोजन कार्यक्रम अधिकारी प्रा. श्रीमती एस.जे.माने , कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.सी.एस.गिरी यांनी केले. यावेळी उपप्राचार्य प्रा.सुनिल चंदनशिवे , प्रा .श्रीमती डॉ. एस. सी. खोले ,प्रा.समाधान बनसोडे , प्रा.दिपक गोडसे ,प्रा.किरण मजलेकर ,प्रा. अक्षय रेडेकर अदिसह शिक्षक , विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी सूत्रसंचालन प्रा.सौ.सारिका मोरे यांनी केले तर प्रास्ताविक प्रा.डॉ. झेड एस कदम यांनी केले तर आभार कार्यक्रम अधिकारी श्रीमती एस.जे.माने यांनी मानले






16/1/2020 - राष्ट्रीय योजनेच्यावतीने हुपरी व रेंदाळ या ठिकाणी "मतदार जनजागृती अभियान" अंतर्गत पथनाट्य सादर करताना राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वंयसेवक.







17/1/ 2020- -राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत दत्तक गाव मौजे तळंदगे येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक ग्रामस्वच्छता करताना.







25 /1/2020-राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने आयोजित "मतदान जनजागृती अभियानांतर्गत" रांगोळी प्रदर्शन आणि भित्तीपत्रिका उद्‌घाटन









2/2/2020- राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने जवाहर साखर कारखाना हुपरी येथील ऊसतोड कामगार महिलांना कपडे व धान्य वाटप करताना महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी श्रीमती संध्या माने आणि इतर स्वयंसेवक




4/2/2020 - राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर मौजे तळंदगे येथे झाले. शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे मा.श्री. भारत आनंदराव पाटील ( माजी उपाध्यक्ष, जिल्हा परिषद कोल्हापूर, संस्थापक, सिद्धेश्वर उद्योगसमूह, कडोली)




6/2/2020-शिबीरकालावधीत मौजे.तळंदगे येथे मा. श्री विनायक चव्हाण (इचलकरंजी) यांची "चमत्काराची किमिया -झुकती है दुनिया" ही तांत्रिक-मांत्रिक बुवाबाजीवर प्रकाश टाकणारा अंधश्रद्धा निर्मूलनाचा कार्यक्रम



8/3/2020- राष्ट्रीय सेवा योजना आणि  मानवी हक्क विभाग  यांच्या वतीने "8 मार्च जागतिक महिला दिनानिमित्त"दत्तक गाव तळंदगे, हुपरी, रेंदाळ येथील ग्रामपंचायत आणि नगरपालिका ग्रामस्वच्छता महिला कर्मचाऱ्यांचा सत्कार करताना मा. नगराध्यक्षा मा.जयश्री गाठ, मा. मीरा बाबर (तुरुंगाधिकारी,कळंबा कारागृह, कोल्हापूर)